|| श्री ||

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

दसरा निमित्त शुभेच्छा! विजयादशमी

अहिल्यानगर | मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०४ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com


## फोडणी

अरुण महादेव वाळुंज | अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### पायपीट

आभासी जगात सारे
रस्त्यावर वेगळं वास्तव
विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर
जगणं म्हणजे विस्तव

दोन वेळच्या भाकरीसाठी
काहींची जीवाची आटापीट
आपल्या सुखासाठी
किती जणांची पायपीट

# गोकुळमध्ये सतेज पाटील पॅनलचा १३ जागांसह विजय

**फेरमतमोजणीवरून मतमोजणी केंद्रात गोंधळ | अमर पाटील यांचा निकाल पलटला, महायुतीला १२ जागा**

**कोल्हापूर | वीरभूमी–** गोकुळ जिल्हा दूध संघाच्या निवडणुकीत अखेर काँग्रेस आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने १३ जागांसह बहुमत मिळवले. महायुतीच्या पॅनलला १२ जागांवर समाधान मानावे लागले. मतमोजणीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत दोन्ही गटांमध्ये चुरस कायम होती. निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीच्या उमेदवारांनी केलेल्या फेरमतमोजणीच्या मागण्यांमुळे मतमोजणी केंद्रावर काही काळ मोठा गोंधळ निर्माण झाला.

गोकुळ दूध संघाच्या २५ संचालकांच्या जागांसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरू झाली. सुमारे ५ हजार मतांची मतमोजणी पूर्ण करण्यासाठी तब्बल १२ तासांचा कालावधी लागला. प्रत्येक फेरीचा निकाल दोन्ही गटांची धाकधूक वाढवणारा ठरला.

संध्याकाळी सहा वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार सतेज पाटील यांच्या पॅनलचे १४ उमेदवार विजयी होत असल्याचे चित्र होते, तर महायुतीचे ११ उमेदवार आघाडीवर होते. मात्र, महायुतीचे उमेदवार अमर पाटील यांनी फेरमतमोजणीची मागणी केली. फेरमतमोजणीत निकाल बदलला आणि अमर पाटील विजयी ठरले. त्यामुळे सतेज पाटील यांच्या पॅनलचे सचिन घोरपडे यांना पराभव स्वीकारावा लागला. या निकालानंतर महायुतीच्या उमेदवारांची संख्या १२ झाली, तर सतेज पाटील यांच्या पॅनलचे १३ उमेदवार विजयी ठरले.

महायुतीच्या पॅनलच्या शौमिका महाडिक यांच्या मतांची दोन वेळा फेरमतमोजणी करण्यात आली. तसेच युवराज बापू पाटील यांच्या मतांची तीन वेळा फेरमतमोजणी घेण्यात आली. आणखी काही जागा वाढवता येतात का, यासाठी महायुतीकडून प्रयत्न करण्यात आले.

महायुतीचे उमेदवार तथा गोकुळचे माजी अध्यक्ष विश्वास आबाजी पाटील आणि युवराज पाटील यांनी आक्षेप नोंदवत फेरमतमोजणीसाठी अर्ज केले होते. या अर्जांवर सतेज पाटील यांच्या पॅनलच्या वकिलांनी आक्षेप घेतला. त्यावर महायुतीच्या पॅनलच्या वकिलांनीही युक्तिवाद केला.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर संबंधित फेरमतमोजणीचे अर्ज फेटाळण्यात आले. त्यामुळे सतेज पाटील यांच्या पॅनलचा १३ जागांसह विजय निश्चित झाला.

गोकुळ दूध संघाची निवडणूक कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. संघावर ज्याची सत्ता असेल, त्याला जिल्ह्याच्या राजकारणात प्रभाव राखता येतो, अशी राजकीय वर्तुळात चर्चा असते.



त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतही महायुती आणि सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीमध्ये काटे की टक्कर पाहायला मिळाली.

सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेला १३ जागांचा आकडा सतेज पाटील यांच्या पॅनलने गाठल्याने त्यांचा विजय निश्चित झाला. फेरमतमोजणीमध्ये आणखी निकाल बदलला असता तर गोकुळच्या सत्तेचे समीकरण बदलण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे फेरमतमोजणीच्या प्रत्येक अर्जाकडे दोन्ही गटांचे लक्ष लागले होते.

फेरमतमोजणीच्या मागण्यांमुळे सतेज पाटील यांच्या पॅनलची धाकधूक वाढली होती. त्यामुळे सतेज पाटील स्वतः सायंकाळी पाच वाजल्यापासून मतमोजणी केंद्रावर उपस्थित होते. मतमोजणी प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये, यासाठी ते केंद्रावर थांबून असल्याचे सांगण्यात आले.

अखेर फेरमतमोजणीचे अर्ज फेटाळल्यानंतर सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने १३ जागांसह गोकुळच्या निवडणुकीत बहुमत मिळवले, तर महायुतीला १२ जागा मिळाल्या.

## SPOT NEWS

### आमदार जितेंद्र आव्हाडांना जीवे मारण्याची धमकी

**मुंबई –** मुंबईत अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराची घटना ताजी असतानाच, आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना जीवे मारण्याची धमकी आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे सिनेसृष्टीत खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना ताजी असतानाच, आता आमदार जितेंद्र आव्हाड यांनाही जीवे मारण्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे. यासंदर्भात आव्हाड यांनी एक मोबाईल नंबर शेअर करत आपल्या ट्विटमध्ये लिहिले आहे की, एका इसमानी दोन ते तीन वेळा मला फोन केला, भ्रमणध्वनीवर अर्वाच्च भाषेत बोलून मारण्याची धमकी दिली. या धक्कादायक प्रकारानंतर आव्हाड यांचे कार्यकर्ते हेमंत वाणी यांनी संबंधित मोबाईल नंबरवर कॉल केला असता, त्या व्यक्तीने त्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. आधी जित्याला गोळ्या घालेन, नंतर तुला पण गोळ्या घालेन, घरच्या बाहेर येऊन गेलो, असे त्या व्यक्तीने वाणी यांना सांगितले. या अत्यंत गंभीर प्रकारानंतर हेमंत वाणी यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेत याप्रकरणी रीतसर तक्रार दाखल केली आहे.

### राज्यात राष्ट्रपती राजवट लावा : संजय राऊत

**मुंबई –** मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत यांनी राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर थेट शरसंधान साधले. तसेच महाराष्ट्रात 'गँगस्टर' राज सुरू असून सत्ताधाऱ्यांचा 'रेझिम चेंज केल्याशिवाय जनता शांत बसणार नाही, असा इशाराही संजय राऊत यांनी या वेळी दिला. राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीवर ताशेरे ओढताना ते म्हणाले, महाराष्ट्राला एक पूर्णवेळ आणि सक्षम गृहमंत्री हवा आहे, अशी मागणी आम्ही सातत्याने करतोय.

# विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबरला मतदान

**मुंबई | वीरभूमी–** सध्या महाराष्ट्रामध्ये विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदानाची जोरदार चर्चा सुरू आहे. या निवडणुकीमुळे संपूर्ण राज्याचं राजकारण ढवळून निघालं आहे. ही, महाराष्ट्र विधान परिषदेची अटीतटीची आणि बहुचर्चित औरंगाबाद, पुणे आणि नागपूर विभागातील तीन पदवीधर सोबतच अमरावती आणि पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीसाठीची मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. पाच मतदार संघामध्ये होणाऱ्या ह्या निवडणूकीमध्ये एकूण १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे आहेत. या निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठीची निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे (शिक्षक आणि पदवीधर), नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्यामुळेभारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेण्यात येत आहे. २३ ऑक्टोबरला निवडणूक झाल्यानंतर मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी केली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तर, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक उमेदवार असून, या पाचही मतदारसंघांत मिळून १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदार ठरविणार आहेत.

पाचही मतदारसंघांमध्ये एकूण १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंद आहे. यामध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत. मतदानासाठी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. सर्व मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

# टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात मोठी कारवाई; सुरत एक्सप्रेसमधून ३ आरोपींना घेतले ताब्यात

**मुंबई | वीरभूमी–** बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणात एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राजस्थानमधील कोटा पोलिसांनी या प्रकरणातील ३ संशयिताला ताब्यात घेतले आहे. टायगर श्राफ याच्यावर गोळीबार केल्यानंतर आरोपींनी दुचाकीवरून पळ काढला होता. अंधेरीत दुचाकी टाकून आरोपींनी रेल्वेने पळ काढला होता. आता आरोपींना सूरत एक्सप्रेसमधून ताब्यात घेण्यात आले आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कोटा रेल्वे स्थानकावरून या संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, या प्रकरणाची कोटा पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. तसेच, सुरक्षेचा मुद्दा आणि तपासाच्या गोपनीयतेमुळे ताब्यात घेतलेल्या संशयिताची ओळख अद्याप उघड करण्यात आलेली नाही. या प्रकरणासंदर्भात कोटा पोलिसांकडून लवकरच अधिकृत माहिती दिली जाण्याची शक्यता आहे.

बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणाचा तपास आता मुंबई क्राईम ब्रँचकडे वर्ग करण्यात आला आहे. सुरुवातीला या प्रकरणी जुहू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, घटनेची संवेदनशीलता पाहता तपास क्राईम ब्रँचकडे सोपवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

गोळीबार करणाऱ्या तीन अज्ञात आरोपींचा शोध घेणे हे सध्या पोलिसांसमोर सर्वात मोठे आव्हान ठरले आहे. यातील ३ संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

# राज्यात पाणीसाठ्यात मोठी घट!

**धरणांमध्ये केवळ ७०.५३ टक्के जलसाठा**

**पुणे | वीरभूमी–** राज्यात यंदा पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहिल्याने जलसाठ्यांवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. वाढत्या तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असून, अनेक भागांत पाणीटंचाईची चिंता निर्माण झाली आहे. अपु–या पावसाचा परिणाम केवळ नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावरच नव्हे, तर शेतीवरही झाला आहे. उष्णतेच्या तीव्रतेमुळे शेतातील पिके करपल्याने शेतक–यांचे मोठे नुकसान झाले आहे.

जलसंपदा विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण ३,०३३ धरण प्रकल्पांमध्ये सध्या ७०.५३ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत यंदा राज्यातील पाणीसाठ्यात सुमारे २० टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे. राज्यातील विविध विभागांमधील जलसाठ्याची स्थिती पाहता काही भागांत समाधानकारक पाणीसाठा असला, तरी काही विभागांमध्ये परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे.



छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांत कमी म्हणजे ४१.८४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे या भागात पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना प्रशासनाला विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे. विभागनिहाय आकडेवारीनुसार, अमरावती विभागात ५९.४७ टक्के, नागपूर विभागात ६५.४३ टक्के, नाशिक विभागात ७८.८८ टक्के आणि पुणे विभागात ८१.२९ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. कोकण विभागाची स्थिती तुलनेने चांगली असून, येथे सर्वाधिक ८७.८४ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे.

राज्यातील जलसाठ्यात झालेली घट लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक बनले आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. आगामी काळात पावसाची स्थिती आणि पाण्याचा वापर यावर राज्यातील जलसंकटाची तीव्रता अवलंबून राहणार आहे.

# रामकुंड येथे ५१ आणि ३१ फुटांचे धर्मध्वज उभारले

**नाशिक | वीरभूमी–** नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला असून, ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील रामकुंड येथे ५१ फूट आणि ३१ फूट उंचीचे दोन धर्मध्वज उभारण्यात आले आहेत. या सोहळ्यामुळे कुंभमेळ्याच्या तयारीतील महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

धर्मध्वजांच्या मुख्य स्तंभावर गरुडाची पितळी मूर्ती बसवण्यात आली आहे, तर दुसऱ्या स्तंभावर मकराची पितळी मूर्ती विराजमान करण्यात आली आहे. ५० फूट उंच क्रेनच्या मदतीने हे उभारणीचे काम शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी दिवसभर सुरू होते. कुंभमेळ्यादरम्यान तसेच त्यानंतरही पाऊस, वारा आणि अन्य हवामानाचा परिणाम होऊ नये, यासाठी ध्वजस्तंभांना पितळेचे आवरण देण्यात आले आहे. सूर्यप्रकाशात ५१ फूट उंचीचा ध्वजस्तंभ सोनेरी रंगात चमकताना दिसतो.

रामकुंड येथे उभारण्यात आलेल्या धर्मध्वजांच्या रचनेत विविध धार्मिक प्रतीकांचा समावेश आहे. मुख्य स्तंभावरील गरुडाची मूर्ती आणि दुसऱ्या स्तंभावरील मकराची मूर्ती धार्मिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित करतात. मकराला गंगा आणि गोदावरीसारख्या पवित्र नद्यांशी संबंधित मानले जाते. तो जलतत्त्व, पवित्रता आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो.

ध्वजस्तंभाच्या पायथ्याशी कमळाच्या आकाराचे कमला पीठ तयार करण्यात आले आहे. कमळ हे पवित्रता, ज्ञान आणि आध्यात्मिक साधनेचे प्रतीक मानले जाते. तसेच ध्वजस्तंभावरील मंगल कलश हा आनंद, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक आहे.

३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्याला साधू, महंत, पुजारी, स्थानिक नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. या सोहळ्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला धार्मिक अधिष्ठान मिळणार आहे.

दरम्यान, रामकुंड परिसरात सोहळ्याच्या तयारीची कामे सुरू आहेत. गौरी तातांगना परिसरातील झोपड्या हटवण्यात आल्यानंतर ताताकुतेखार पुलाजवळील अतिक्रमणेही हटवण्यात आल्याची माहिती आहे.

## SPOT NEWS



### अगस्ती विद्यालयाच्या नेटबॉल संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेत दुहेरी बाजी!

● **अकोले । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशन, अकोले यांच्या वतीने आयोजित भव्य जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धा २०२६–२७ मध्ये अगस्ती विद्यालय, अकोले येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. विद्यालयाच्या १४ वर्षांखालील व १७ वर्षांखालील मुलांच्या संघांनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर दोन्ही वयोगटांत प्रथम क्रमांक पटकावत विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात मानाचा तुरा रोवला. अगस्ती महाविद्यालयाच्या मैदानावर संपन्न झालेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मैदानावर उत्कृष्ट सांघिक खेळ, अचूक पासिंग, चपळता, शिस्त आणि जिद्द यांचे प्रभावी प्रदर्शन केले. त्यांच्या खेळातील समन्वय आणि विजयासाठीची चिकाटी यांमुळे दोन्ही संघांना हे यश मिळाले. या यशस्वी संघांना विद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक ओम बाणाईत सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नियमित सराव आणि मेहनतीच्या जोरावर हे उल्लेखनीय यश मिळविले. दोन्ही संघांच्या या शानदार कामगिरीबद्दल यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक ओम बाणाईत सर यांचे संस्थेच्या सेक्रेटरी शैलेजा पोखरकर, कार्यवाहक शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक संजय शिंदे, उपमुख्याध्यापक संदीप दरोळे, पर्यवेक्षक विजय नाईकवाडी, शाळा व्यवस्थापनचे दत्ता नवले, प्रकाश साळवे, गिरीश नवले, दौलत कानवडे आदींनी अभिनंदन केले. तसेच पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मोहरी येथे जि. प. शाळेत मिशन आपुलकी अंतर्गत लोकसहभागातून मोफत दप्तरचे वाटप



● **पाथर्डी । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेनुसार शाळा विकासात जास्तीत जास्त लोकसहभाग वाढविण्यासाठी मिशन आपुलकी अभियान राबविण्यात येते. या अभियाना अंतर्गत तालुक्यातील मोहरी येथील जि.प. शाळा येथे सौ.अर्चना शशिकांत गवळी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी सचिन राख तर अध्यक्षस्थानी सरपंच सौ. आशाताई पोपट वाल्हेकर, निलेश क्षीरसागर, देवेंद्र अंबेटकर, ॲड. अरविंद आंबेटकर, इरफान पठाण, अशोक देवकाते, ज्ञानेश्वर लाड, सविता नरोटे व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री राख यांनी उपक्रमाचे कौतुक करून जिल्हा परिषद शाळेत राबवीत असलेल्या विविध योजनांची, उपक्रमांची माहिती देऊन आजचे जे प्रशासकीय पदावर अधिकारी आहेत ते सर्व जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी असून जिल्हा परिषदेचे विद्यार्थी सर्व गुणसंपन्न व स्पर्धेत टिकणारे असतात. शाळा स्तरावर कुसुमाग्रज वाचनालयामुळे विद्यार्थ्यांची निर्णय क्षमता वाढत आहे. लोकसहभागातून, माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने शाळेच्या विकासात भर पडत असल्याचे सांगितले. यावेळी सौ. अर्चना गवळी यांनी पुढील वर्षापासून इयत्ता सहावी व सातवीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याचे आश्वासन दिले. माजी विद्यार्थी संघाच्या प्रयत्नातून शालेय परिसर सुशोभिकरण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिलेले आहेत. मुख्याध्यापिका श्रीमती सीमा निकाळजे व शिक्षकांच्या प्रयत्नातून लोकसहभागाने हा उपक्रम घेण्यात आला.

### निमगाव वाघात कवितेतून पर्यावरण जागृतीचा जागर

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

नवरात्र उत्सवाला सामाजिक प्रबोधनाची जोड देत नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे कवितेच्या माध्यमातून पर्यावरण जागृती करण्यात आली. प्लास्टिकचा वाढता वापर, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता आणि पर्यावरणापुढील विविध आव्हाने यांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी काव्याच्या माध्यमातून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला. जिल्हा परिषदेच्या 'नवरात्री स्वच्छता उत्सव' या उपक्रमांतर्गत स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने गावात नवरात्रोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# वांबोरी चारीच्या पाण्यासाठी तिसगावात दीड तास रास्ता रोको!

**तिसगाव-मढी लाईनला पाणी सोडण्याची मागणी । २ नोव्हेंबरपासून पाणीपुरवठा सुरू करण्याचे पाटबंधारे विभागाचे लेखी आश्वासन**

● **पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी, नगर आणि राहुरी तालुक्यांतील ४५ गावांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या वांबोरी चारीच्या पाण्यासाठी मढी, घाटशिरस, सातवड, करंजी, भोसे, लोहसर आणि कोल्हार परिसरातील शेतकऱ्यांनी सोमवारी तिसगाव येथील वृद्धेश्वर चौकात सुमारे दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. तिसगाव–मढी लाईनला तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. मुळा पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व माजी जिल्हा परिषद सदस्य शिवशंकर राजळे, माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, संभाजी पालवे, संजय मरकड, बंडू पाठक, राजेंद्र पाठक, राजेंद्र दगडखैर, अंबादास डमाळे, अशोक टेमकर आणि सचिन मरकड यांनी केले.

परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेती आणि पशुधनासाठी वांबोरी चारीच्या पाण्याची नितांत गरज आहे. मुळा पाटबंधारे विभागाने प्रत्येक पाझर तलावात पाणी सोडण्याची व्यवस्था करावी आणि शेतकऱ्यांच्या पशुधनाची तहान



भागवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आंदोलकांनी केली.

यावेळी अनेक शेतकऱ्यांनी वांबोरी चारीच्या पाणीवाटपाबाबत आपल्या भावना व्यक्त करत व्यवस्थापनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. पाण्याअभावी निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आंदोलनादरम्यान मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, उपअभियंता विलास पाटील आणि शाखा अभियंता तुषार गर्जे यांनी आंदोलकांना लेखी आश्वासन दिले. त्यानुसार, २ नोव्हेंबरपासून तिसगाव–मढी लाईनसाठी पुन्हा पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार आहे. तसेच सातवड ते घाटशिरसदरम्यान बूस्टर पंप बसविण्याबाबत वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. येत्या काही दिवसांत मुख्य पाइपलाइन आणि एअर व्हॉल्व्ह दुरुस्तीचे कामही हाती घेण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन स्थगित केले.

नवरात्रोत्सवाच्या काळात तिसगाव येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे श्रीक्षेत्र मोहटादेवी गडाकडे जाणाऱ्या भाविकांसह इतर प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

यावेळी उपसरपंच बंटी अकोलकर, भरत शिंदे, माणिक शिंदे, विजय शिंदे, मनोज ससाणे, रवींद्र भापसे, शहाजी पाठक मेजर, दादासाहेब चोथे, देविदास टेमकर, वसंत वारे, आसाराम अकोलकर, सागर हांडे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

## संजीवनी डी. फार्मसीला एनबीए मानांकन

**राष्ट्रीय मानांकनामुळे संजीवनीच्या गुणवत्तेवर उमटली मोहर**

● **कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च (डी. फार्मसी) या संस्थेला भारत सरकारच्या व्यावसायिक शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करणाऱ्या नवी दिल्ली येथील 'नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन' (एनबीए) या स्वायत्त संस्थेने पुढील तीन वर्षांसाठी प्रतिष्ठित 'एनबीए' मानांकन बहाल केले आहे. त्यामुळे संजीवनीच्या शैक्षणिक गुणवत्तेवर राष्ट्रीय स्तरावर मोहर उमटली असून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी माहिती संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.




एनबीए मानांकनासाठी संस्थेने मागील तीन वर्षांतील विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या, उच्चविद्याविभूषित व अनुभवी प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी–शिक्षक प्रमाण, प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे वाढते उत्तीर्ण प्रमाण, उच्च शिक्षणासाठी परदेशात व नामांकित संस्थांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी यांचा सविस्तर अहवाल सादर केला होता.

यासोबतच प्राध्यापकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतलेल्या परिसंवादांची माहिती, सादर केलेले शोधनिबंध, कार्यशाळा, कन्सल्टन्सी, विद्यार्थ्यांनी क्रीडा व अन्य क्षेत्रांत मिळवलेले प्राविण्य, अत्याधुनिक प्रयोगशाळा, जागतिक दर्जाच्या कंपन्यांशी केलेले सामंजस्य करार, विविध कंपन्यांमध्ये उच्च पदांवर कार्यरत असलेले माजी विद्यार्थी आणि त्यांच्याबाबत कंपन्यांकडून मिळालेला सकारात्मक अभिप्राय तसेच पालकांचा संस्थेवरील विश्वास आदी बाबींचे पुराव्यासह सादरीकरण करण्यात आले. एनबीएच्या कठोर कार्यपद्धतीनुसार राष्ट्रीय समितीने संस्थेने सादर केलेल्या पुराव्यांची व विविध निकषांची प्रत्यक्ष पडताळणी केली. यानंतर संस्थेला पुढील तीन वर्षांसाठी अधिकृत मानांकन बहाल करण्यात आले.

महाराष्ट्रात सुमारे ५०० पेक्षा अधिक डी. फार्मसी संस्था कार्यरत असून त्यापैकी सुमारे २५ संस्थांनाच आतापर्यंत एनबीए मानांकन मिळाले आहे. त्यामध्ये आता संजीवनी डी. फार्मसीचा समावेश झाला आहे.

या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे आणि संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे यांनी हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. आर. एस. शेंडगे, हेड ऑफ इन्स्टिट्यूट सर्व्हिसेस प्रकाश जाधव, प्राचार्य डॉ. निलेश पेंडभाजे, प्रा. संतोष रावतोळे, प्रा. अमित नारंग, प्रा. शाहिन पठाण, प्रा. वेदिका कालेवार, प्रा. आदिती काटे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

## लोकशाही व संविधानविरोधी धोरणांच्या निषेधार्थ पारनेरमध्ये तिरंगा रॅली काढून पोलीस प्रशासनाला निवेदन

● **पारनेर । वीरभूमी–**

लोकशाही, संविधान आणि नागरिकांच्या घटनात्मक मूलभूत अधिकारांची गळचेपी होत असल्याचा आरोप करत केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात पारनेर येथे लोकशाही व संविधानप्रेमी नागरिक, पक्ष आणि संघटनांच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. यासंदर्भात पारनेर पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. तसेच विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.



दिल्लीतील जंतर–मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी, युवक, बेरोजगार आणि नागरिकांच्या आंदोलनाला निवेदनातून पाठिंबा देण्यात आला. या आंदोलनादरम्यान आंदोलकांवर कथितरीत्या झालेल्या पोलिसी अत्याचारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ नुसार नागरिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य, शांततेने एकत्र येण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, सरकारच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या आंदोलकांना दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जंतर–मंतर येथील आंदोलनादरम्यान विद्यार्थी, युवती आणि आंदोलनाचे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोपही करण्यात आला. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरचा वापर करावा, मतदारांच्या अधिकारांवर परिणाम होत असल्याचा आरोप असलेली एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, शिक्षणाचे बाजारीकरण थांबवावे आणि पेपरफुटीसारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा कराव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कागदपत्रे आणि ऑनलाइन प्रक्रियेत न अडकवता सरसकट आर्थिक मदत द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली. शेतमजूर, कामगार आणि बलुतेदारांना आर्थिक मदत द्यावी, तसेच बलुतेदारांची लघुउद्योगांसाठी घेतलेली कर्जे माफ करावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदनात अंकिता भंडारी प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला असून, दुष्यंतकुमार यांच्या राज्यपालपदावरील नियुक्तीबाबतही आक्षेप नोंदविण्यात आला आहे. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर (आरएसएस) कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

## अतिरिक्त सहा इंची पाइपलाइनमुळे आयटीआय टाकीवरील शेवगावातील उपनगरांचा पाणीप्रश्न सुटणार

● **शेवगाव । वीरभूमी–**

शहरातील आय टी आय जवळील पाण्याच्या टाकीवर अवलंबून असलेल्या उपनगरांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी अतिरिक्त सहा इंची पाइपलाइन टाकण्यात आली आहे. या उपाययोजनेमुळे गेल्या काही वर्षांपासून १२ ते १५ दिवसांच्या अंतराने होणारा पाणीपुरवठा आठ ते दहा दिवसांवर आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ऐन दुष्काळात पाण्यासाठी प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना यामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

शहरातील प्रभाग क्रमांक ६, ७, ८, ९, १० आणि ११ मधील काही भागांत दीर्घकाळापासून अनियमित पाणीपुरवठ्याची समस्या आहे. खंडोबानगर, कोरडे वस्ती, शास्त्रीनगर, निर्मलनगर, इंदिरानगर, भारस्करवाडी, लक्ष्मीनगर, विद्यानगर, लांडे वस्ती, ईदगाह मैदान परिसर, कर्डिले वस्ती, रामनगर, शामनगर, आखेगाव रस्ता तसेच आयटीआयसमोरील भागातील नागरिकांना पाण्यासाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत होती.

या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी नगरसेवकांनी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत अतिरिक्त पाइपलाइन टाकण्याची मागणी वारंवार केली होती. या मागणीची दखल घेत मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार आयटीआय टाकीला अतिरिक्त सहा इंची पाइपलाइन जोडण्यात आली आहे.



नवीन पाइपलाइनमुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक प्रभावी होऊन पाणी मिळण्यातील अंतर कमी होण्यास मदत होणार आहे. मात्र, प्रत्यक्षात नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतरच या उपाययोजनेचा नागरिकांना कितपत लाभ होतो, हे स्पष्ट होणार आहे.

या कामाच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष ताहेर पटेल, नगरसेवक आशुतोष डहाळे, अमर पुरनाळे, वजीर पठाण, निलेश रोकडे, संतोष जाधव, रोहित काथवटे, राहुल मगरे, प्रवीण भारस्कर, बाबासाहेब लांडे, पाणीपुरवठा विभागाचे शरद लांडे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

**पाणीपुरवठ्याचे नियोजन सुधारण्यास मदत होईल**

■ आयटीआय टाकीवरील उपनगरांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या समस्येची दखल घेऊन अतिरिक्त सहा इंची पाइपलाइन टाकण्यात आली आहे. या कामामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन सुधारण्यास मदत होईल. नागरिकांना कमी कालावधीत नियमित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषद प्रशासन प्रयत्नशील असून, पाणीपुरवठा व्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

**– विजया घाडगे,**
मुख्याधिकारी, नगरपरिषद
शेवगाव

## पीएनजी ज्वेलर्स तर्फे सप्तम कलेक्शनसह दिवाळीचा उत्सव; सर्व स्टोअर्समध्ये आकर्षक फेस्टिव्ह ऑफर्स

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित दागिन्यांच्या ब्रँड्सपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सने दिवाळीनिमित्त विशेष मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेचे मुख्य आकर्षण म्हणजे 'सप्तम कलेक्शन'. या निमित्ताने ग्राहकांना सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५० टक्क्यांपर्यंत*, तर हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर १०० टक्क्यांपर्यंत* सूट मिळणार आहे. जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना कोणतीही कपात केली जाणार नाही. (हे सर्व लाभ नियम व अटींच्या अधीन आहेत).

या मोहिमेअंतर्गत पीएनजी ज्वेलर्स तर्फे 'प्युअर प्राइस' सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेनुसार, दागिन्यांची बुकिंग करताना बुकिंगच्या दिवशी किंवा बिलिंगच्या दिवशी लागू असलेल्या सोन्याच्या दरांपैकी जो दर कमी असेल, त्या दराचा लाभ ग्राहकांना मिळेल. त्यामुळे सोन्याच्या दरातील चढ–उतार लक्षात घेऊन ग्राहकांना खरेदीचे नियोजन करता येईल. या ऑफर्स पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व स्टोअर्समध्ये १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत उपलब्ध असतील.

या मोहिमेचे प्रमुख आकर्षण असलेले 'सप्तम कलेक्शन' हे दिवाळीच्या उत्सवाशी निगडित सात भावनांपासून प्रेरित आहे. या कलेक्शनमध्ये पारंपरिक अँटिक गोल्ड आणि हिऱ्यांच्या दागिन्यांचा समावेश आहे. नेकलेस, इअरिंग्स, अंगठ्या आणि ब्रेसलेट्स अशा विविध प्रकारांतील दागिने यामध्ये उपलब्ध आहेत. या कलेक्शनमध्ये पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक शैलीचा मिलाफ साधणाऱ्या, तसेच दैनंदिन वापरासाठीही सहज परिधान करता येतील अशा आकर्षक डिझाइन्स सादर करण्यात आल्या आहेत.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, दिवाळी हा भारतात सोन्याच्या खरेदीसाठी सर्वात महत्त्वाच्या सणांपैकी एक आहे.या खरेदीला सांस्कृतिक महत्त्व आहेच, शिवाय गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातूनही पहिले जाते. अलीकडे सोन्याच्या दरात झालेल्या घसरणीनंतर ग्राहकांमध्ये खरेदीबाबत उत्साह दिसून येत आहे. विशेषतः सणासुदीच्या आणि आगामी लग्नसराईच्या खरेदीला ग्राहक प्राधान्य देत आहेत. सप्तम कलेक्शनच्या माध्यमातून आम्ही दिवाळीशी निगडित भावनांना आकर्षक दागिन्यांच्या डिझाइन्समधून साकारले आहे. मेकिंग चार्जेसवरील विशेष सवलती आणि जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना कोणतीही कपात न करण्याच्या सुविधेमुळे ग्राहकांना आपल्या बजेटनुसार जुन्या दागिन्यांच्या जागी नवीन डिझाइन्स निवडता येतील. नवनवीन डिझाइन्स आणि पिढ्यान्पिढ्या आमच्याशी जोडलेल्या कुटुंबांचा विश्वास यांच्या बळावर आम्ही आगामी सणासुदीच्या हंगामासाठी सज्ज आहोत.



भारतात दिवाळी हा सोने आणि दागिन्यांच्या खरेदीसाठी शुभ मुहूर्त मानला जातो. या मोहिमेद्वारे पीएनजी ज्वेलर्सने शुद्धता, विश्वास आणि उत्कृष्ट कारागिरी यांप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे. या दिवाळीत ग्राहकांना सप्तम आणि ईना कलेक्शन मधील विविध डिझाइन्स अनुभवता येणार आहेत. पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक शैली यांचा सुंदर मिलाफ या दागिन्यांमध्ये पाहायला मिळतो.

दिवाळीनंतर लगेच सुरू होणाऱ्या लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर, आगामी महिन्यांतील खरेदीचे नियोजन करण्याची संधीही या मोहिमेमुळे ग्राहकांना मिळणार आहे. १९४ वर्षांची परंपरा, विश्वास, शुद्धता आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा वारसा जपत पीएनजी ज्वेलर्स विविध खास प्रसंगांसाठी दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध करून देत आहे.

*** (हे सर्व लाभ नियम व अटींच्या अधीन आहेत)**

## SPOT NEWS



## पुढील पिढीसाठी निसर्गाची जपणूक करा! : बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे

**● अकोले । वीरभूमी –**

पुढील पिढीच्या भविष्यासाठी आता तरी जागे व्हा. निसर्गाची जपणूक करा, भरपूर झाडे लावा आणि ती जगवा. जंगलांना वणवे लावू नका, असे आवाहन बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी केले. बारी येथील कळसुबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील भ. बा. सावंतबाबा नूतन सभागृहाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. त्यांच्या हस्ते सभागृहाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सदाशिव खाडे होते. राहीबाई पोपेरे म्हणाल्या की, दररोजच्या आहारात विषमुक्त अन्नाचा समावेश करण्यासाठी सेंद्रिय शेतीकडे वळणे गरजेचे आहे. काळ्या आईसमान असलेल्या मातीचे जिवापाड जतन केले पाहिजे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे मातीचे आरोग्य बिघडल्यास पुढील पिढ्यांचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. त्यामुळे निसर्ग आणि पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज आहे. आपण निसर्गपूजक आहोत, त्यामुळे निसर्गाचे जतन करण्याची सर्वाधिक जबाबदारीही आपलीच आहे. शाळा–महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या आई–वडिलांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून द्यावे. वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संगोपन करावे आणि जंगलांचे संरक्षण करावे, असे आवाहन त्यांनी विद्यार्थी, महिला आणि पालकांशी संवाद साधताना केले.कार्यक्रमाला धुळा पाटील खाडे, काशीनाथ खोले, नामदेव खाडे, तुळशीराम लांडगे, राजेंद्र जाधव, राजाभाऊ अवसक, पंढरीनाथ खाडे, गणेश खाडे, वैशाली दराणे, बीना सावंत आणि वनिता सहाणे उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुश खाडे यांनी प्रास्ताविक केले, तर दत्तात्रय कासार यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला बारी, जहागिरदारवाडी आणि पेंडशेत येथील ग्रामस्थ, महिला पालक तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीगोंद्यात २७ ऑक्टोबरला महसूल लोक अदालत; अर्जासाठी २३ ऑक्टोबरपर्यंत मुदत

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

महसूल विभागातील प्रलंबित जमीनविषयक दाव्यांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी श्रीगोंदा तहसील कार्यालयाच्या वतीने 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत तहसील कार्यालयात लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये जमीनविषयक प्रलंबित महसुली दावे, कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांतर्गत प्रकरणे, मामलतदार न्यायालयातील दावे, वारस नोंदी, अधिकार अभिलेख, ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमांतर्गत वाटपाच्या प्रकरणांचा समावेश आहे. प्रलंबित प्रकरणे संबंधित पक्षकारांच्या परस्पर सहमतीने आणि सामंजस्यातून निकाली काढण्यावर या अभियानात भर देण्यात येणार आहे. इच्छुक पक्षकारांनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत. महसुली प्रकरणांचा जलद निपटारा करून पक्षकारांना दिलासा मिळवून देण्यासाठी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीगोंद्याचे तहसीलदार सचिन डोंगरे यांनी केले आहे.

## चतुरा थोरवे यांचे निधन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**



सावेडीतील सोनानगर चौक येथील ज्येष्ठ नागरिक चतुरा राजाराम थोरवे (वय ७० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, तीन मुली व एक मुलगा, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मूळ आष्टी तालुक्यातील पुंडी या गावच्या त्या रहिवासी होत्या. मात्र, अनेक वर्षांपासून सावेडीतील सोनानगर चौकातील निवासस्थानी राहत होत्या. त्या खूप शांत, मनमिळावू व धार्मिक स्वभावाच्या असल्याने त्यांचा मोठा स्नेही परिवार होता. कर्जत तालुका दूध संघाचे संकलन विभागप्रमुख राजाराम थोरवे यांच्या त्या पत्नी, तर संदीप थोरवे, प्रा. भारती औटी, प्रा. डॉ. ज्योती खराडे, डॉ. प्रीती शेटे यांच्या त्या मातोश्री होत.

# नागेश्वर उद्यानातील खेळाचे साहित्य गायब; जबाबदार कोण?

### झोपाळा, घसरगुंडी, बाकांसह साहित्य हटविले । पारनेरकरांकडून स्पष्टीकरणाची मागणी

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहरातील नागेश्वर मंदिराशेजारी असलेल्या नागेश्वर उद्यानातील लहान मुलांच्या खेळण्याचे साहित्य आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीचे बाक हटविण्यात आल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी सुसज्ज करण्यात आलेल्या या उद्यानातील झोपाळा, घसरगुंडी, चढण्या–उतरण्यासाठीची जाळी, स्प्रिंग रायडर, प्रकाशव्यवस्थेसाठीचे खांब आणि बाक दिसेनासे झाल्याने हे साहित्य नेमके कुठे गेले, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

पारनेर शहरातील नागेश्वर मंदिर परिसर हा वर्दळीचा भाग आहे. लहान मुले, पालक आणि ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळ्यासाठी हक्काची जागा मिळावी, या उद्देशाने येथे नागेश्वर उद्यान विकसित करण्यात आले होते. मुलांसाठी विविध खेळणी आणि नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था केल्याने या उद्यानाचा परिसरातील नागरिकांना फायदा होत होता.

मात्र, उद्यानाच्या दुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर येथील साहित्य हटविण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. उद्यानातील



साहित्य कोठे हलविण्यात आले, ते सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था काय आहे आणि उद्यानाच्या नूतनीकरणाचे काम कधी सुरू होणार, याबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे.

सार्वजनिक निधीतून उभारलेल्या सुविधांची देखभाल आणि सुरक्षितता राखणे ही संबंधित प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे उद्यानातील साहित्य हटविण्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करून उद्यान पुन्हा नागरिकांसाठी खुले करण्याची कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

लहान मुलांच्या मनोरंजनासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी असलेल्या उद्यानातील सुविधा बंद झाल्याने सार्वजनिक मालमत्तेच्या वापराचा आणि देखभालीचा प्रश्न चर्चेत आला आहे. उद्यानाचे नूतनीकरण कधी होणार आणि नागरिकांना पुन्हा या सुविधा कधी उपलब्ध होणार, याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

**उद्यानाच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव तयार करणार : मुख्याधिकारी**

■ नागेश्वर उद्यानातील लहान मुलांचे खेळाचे साहित्य जिल्हा परिषद मुलांच्या शाळेला देण्यात आले आहे. उद्यानाच्या नूतनीकरणासाठी नव्याने प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. मात्र, रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत निर्णय होईपर्यंत हे काम थांबविण्यात आले आहे, अशी माहिती पारनेर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांनी दिली.

## दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना १०० टक्के शुल्कमाफी द्या! चारा छावण्या, चारा डेपो तातडीने सुरू करा

### कर्जवसुली स्थगिती आणि तलावांतील पाणीउपसा रोखण्याची संभाजी ब्रिगेडची मागणी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

तालुक्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्कमाफी द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या व डेपो तातडीने सुरू करावेत, तसेच कर्जवसुली स्थगिती आणि तलावांतील पाणीउपशाबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तहसीलदार सचिन डोंगरे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

दुष्काळामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च पेलणेही कठीण झाले असून, शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांना संपूर्ण शुल्कमाफी देण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.



तालुक्यात चारा टंचाई तीव्र होत असल्याने जनावरांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे चारा टंचाईचा आढावा घेऊन गरजेनुसार चारा छावण्या व डेपो सुरू करण्यासाठी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा. तसेच पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तलावांतील पाणीउपशाच्या तक्रारींची चौकशी करून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीतही काही ठिकाणी कर्जवसुली सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. याची चौकशी करून शासनाच्या लागू निर्देशांनुसार कर्जवसुली स्थगितीबाबत कार्यवाही करावी. नागरिक आणि पशुधनासाठी पाण्याची योग्य व्यवस्था करावी, तसेच शासनाच्या दुष्काळ निवारण उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. शामभाऊ जरे यांनी केले.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष अ‍ॅड. राजेंद्र राऊत, तालुका सचिव रवींद्र महांडुळे, शेतकरी आघाडीचे तालुकाध्यक्ष उत्तम घोगरे, संघटक संतोष आरडे, पोपट दरेकर, संदीप महांडुळे, हरिभाऊ महांडुळे, बाळकृष्ण महांडुळे आदी उपस्थित होते.

## शेवगावकरांची घरपट्टी-पाणीपट्टी माफ करा

### आरोग्य सभापती दीप्ती गांधी यांचे नगराध्यक्षांना निवेदन

**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव शहरातील नागरिकांना आर्थिक दिलासा देण्यासाठी घरपट्टी, मालमत्ता कर आणि पाणीपट्टी माफ करावी, अशी मागणी नगरसेविका तथा आरोग्य समितीच्या सभापती दीप्ती कमलेश गांधी यांनी नगरपरिषदेच्या मासिक सर्वसाधारण सभेत केली. सोमवारी झालेल्या सभेत त्यांनी हा विषय ऐनवेळी उपस्थित करून लोकनियुक्त नगराध्यक्षा माया मुंढे यांना निवेदन दिले.



निवेदनात म्हटले आहे की, यंदा पावसाने पाठ फिरवल्याने शहरात भीषण पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाअभावी शहरासह परिसरातील जवळपास ९० टक्के बोअरवेल आणि विहिरींमधील पाणीसाठा संपल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पाण्याचे नवीन स्रोत उपलब्ध नसल्याने आगामी काळात टंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

या गंभीर परिस्थितीत नागरिकांवर घरपट्टी आणि पाणीपट्टीचा आर्थिक भार टाकण्याऐवजी त्यांना दिलासा देण्यासाठी नगरपरिषदेने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी गांधी यांनी केली. राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या माध्यमातून दिलासा दिला आहे. त्याच धर्तीवर पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनाही करमाफीच्या माध्यमातून मदत करावी, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

या मागणीला नगरपरिषदेतील नगरसेवकांनी एकमुखाने पाठिंबा दिल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर नगराध्यक्षा माया मुंढे यांनी मुख्याधिकारी विजया घाडगे यांना यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले.

घरपट्टी आणि पाणीपट्टी माफीचा मुद्दा शासनदरबारी मांडून नागरिकांना आर्थिक दिलासा मिळवून देण्यासाठी आमदार मोनिका राजळे आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे यांनीही पाठपुरावा करावा, अशी मागणी दीप्ती गांधी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेत भोंडला उत्साहात साजरा

### पारंपरिक गीतांवर विद्यार्थ्यांचे टिपरी नृत्य । लोकसंस्कृतीच्या जतनासाठी उपक्रम

**● अकोले । वीरभूमी –**

येथील ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालक मंदिरात बालगोपाळांचा भोंडला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्राच्या पारंपरिक संस्कृतीचे जतन व्हावे आणि विद्यार्थ्यांना लोकपरंपरेची ओळख व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे पूजन डॉ. सुधाताई देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिलीपभाई शहा, बाळासाहेब वडजे, प्रतिमा कुलकर्णी, स्मिता मुंदडा आणि अमोल वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकांनीही कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शुभांगी जगधने यांनी केले. भोंडला या पारंपरिक लोकउत्सवाचे महत्त्व, त्यामागील सांस्कृतिक परंपरा तसेच विद्यार्थ्यांमध्ये आनंद, एकोपा आणि सांस्कृतिक मूल्यांची रुजवण करण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले.

विद्यार्थी आणि पालकांनी भोंडल्याच्या पारंपरिक गीतांवर सुंदर टिपरी नृत्य सादर केले. 'भोंडला आला रे आला', 'भोंडला संपला रे संपला' अशा गीतांच्या गायनाने कार्यक्रमात रंगत आणली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची जवळून ओळख झाली. तसेच शाळेच्या परिसरात आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.

शाळेचे मुख्याध्यापक सचिन मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंदाने कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.



यावेळी अकोले नगरपंचायतीच्या नगरसेविका शीतल वैद्य, अ‍ॅड. मनीष पवार, कीर्ती बंगाळ, डॉ. स्नेहा लोखंडे, अश्विनी वाकचौरे, सारिका बागुल, प्रमिला हांडे आदी पालक उपस्थित होते. पालकांच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरकार सर्वतोपरी मदत करणार

### आ. शिवाजीराव गर्जे यांची वाळुंज येथे बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी । एका महिन्याचे वेतन मदतीसाठी देणार

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यात यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विहिरींनी तळ गाठला असून, जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या संकटाच्या काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, दुष्काळग्रस्तांना सर्वतोपरी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही आमदार शिवाजीराव गर्जे यांनी दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील वाळुंज येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार गर्जे यांनी दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रणजित भैय्या बेळगे यांच्या संकल्पनेतून दुष्काळग्रस्त नागरिकांसाठी मोफत टँकरद्वारे पाणीवाटप उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच श्रीक्षेत्र तारकेश्वर गडावरील गोशाळेला भेट देऊन महंत आदिनाथ शास्त्री यांच्याकडून दुष्काळामुळे गोशाळेला भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती घेण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार गर्जे म्हणाले की, १९७२ च्या दुष्काळातही विहिरींमध्ये आणि जमिनीत काही प्रमाणात पाणी उपलब्ध होते. मात्र, सध्याची परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. विहिरींच्या तळाशी गवत उगवले असून, तेही जळू लागले आहे. सध्याची परिस्थिती उन्हाळ्यासारखी झाली असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठीही काटकसर करावी लागत आहे.

कपाशीच्या बोंडांची वाढ खुंटली असून, बोंडे लहान राहून जळून गेली आहेत. इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे भरून न येणारे नुकसान झाले असून, त्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्नही आगामी काळात अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याने पशुधन वाचविण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

जनावरांच्या छावण्या सुरू करण्याऐवजी पशुपालक शेतकऱ्यांना जनावरांच्या संख्येनुसार आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करावी, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे. थेट आर्थिक मदत मिळाल्यास शेतकऱ्यांना आपल्या जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करणे शक्य होईल.

शेतकऱ्यांची ही मागणी शासनापर्यंत पोहोचविण्यात येईल. महायुती सरकार दुष्काळी परिस्थितीबाबत गंभीर असून, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाकडून परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यात येतील आणि दुष्काळग्रस्तांना लवकरात लवकर मदत मिळेल, असा विश्वास गर्जे यांनी व्यक्त केला.

दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आपण आपल्या एका महिन्याचे वेतन दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देण्याचा निर्णय घेतल्याचे आमदार गर्जे यांनी जाहीर केले. तसेच स्थानिक पातळीवरील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शेतकरी व दुष्काळग्रस्त



नागरिकांना मदत होईल, असे उपक्रम राबवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वाळुंज येथे सुरू करण्यात आलेला मोफत टँकर पाणीवाटप उपक्रम दुष्काळग्रस्त नागरिकांना दिलासा देणारा ठरणार आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे भीमराव फुंदे, तालुकाध्यक्ष रणजित बेळगे, महिला अध्यक्ष मनिषाताई डांभे, अ‍ॅड. अंकुश गर्जे, श्रीकांत खेडकर, राहुल ढाकणे, बबन बांगर, अशोक फुंदे, महादेव बेळगे, भास्कर बेळगे, अशोक शेळके, रघुनाथ साठे, अनिल आढागळे, दीपक साठे, दादासाहेब बेळगे, गोरक्ष बेळगे, ज्ञानदेव बेळगे आदी उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# वेदमंत्रांच्या जयघोषात मोहटादेवी गडावर नवरात्रोत्सवाची होमहवन पूर्णाहुती

## अष्टमीला कुमारिका पूजन, शतचंडी पाठ व महाआरती । लाखो भाविकांची उपस्थिती, स्वच्छता आणि व्यवस्थेचे भाविकांकडून कौतुक

**• पाथर्डी । वीरभूमी–**

**दुष्काळाचे संकट दूर व्हावे, विपुल पर्जन्यवृष्टी व्हावी, बळीराजासह सर्वांना सुख–समृद्धी लाभावी, पशुपक्ष्यांसह सर्व प्राणिमात्रांना पुरेसे अन्नधान्य व चारा मिळावा आणि राष्ट्रावरील संकटे दूर व्हावीत, अशी वैश्विक कल्याणाची प्रार्थना आई जगदंबेच्या चरणी करण्यात आली. वेदमंत्रांचा जयघोष, मंगलवाद्यांचे सूर आणि पारंपरिक धार्मिक विधींच्या वातावरणात श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर शारदीय नवरात्रोत्सवाची अष्टमीच्या होमहवन व पूर्णाहुतीने सांगता झाली.**

मोहटादेवी देवस्थानात अष्टमीनिमित्त होमहवन, कुमारिका पूजन, शतचंडी पाठ आणि वेदमंत्रोच्चार असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त नवनाथ जगताप आणि सौ. सुजाता जगताप यांच्या हस्ते सर्व धार्मिक विधी करण्यात आले. वेदशास्त्रसंपन्न भूषणदेव साकरे, नारायणदेव सुलाखे, भास्कर देशपांडे, नागेश घायाळ, सुहास रामदासी, विशाल किडे, भगवान जोशी, महेश झेंड आणि बाळासाहेब देशपांडे आदी ब्रह्मवृंदांनी पौरोहित्य केले. काशिनाथ पवार यांच्या पारंपरिक संबळ वादनामुळे पूर्णाहुती सोहळा भावपूर्ण वातावरणात पार पडला.

दुपारी बाराच्या सुमारास महाआरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या आठ दिवसांत राज्याच्या कानाकोपऱ्यांतून लाखो भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी गडावर हजेरी लावली. यंदा भाविकांच्या खासगी वाहनांना देवी मंदिरापर्यंत जाण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

दुष्काळी परिस्थिती आणि ऊसतोड कामगारांचा हंगाम लवकर सुरू झाल्यामुळे नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी भाविकांची संख्या तुलनेने कमी होती. मात्र, पाचव्या माळेपासून गर्दीत वाढ झाली आणि सातव्या माळेला भाविकांच्या संख्येने उच्चांक गाठला. यावेळी यापूर्वीचे गर्दीचे उच्चांक मागे पडल्याचे चित्र दिसून आले.

जिल्हा पोलीस प्रमुखांकडून वाढीव पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात आल्याने गंभीर स्वरूपाचे गुन्हेगारी प्रकार घडले नाहीत. भाविकांसाठी आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, निवास आणि वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली होती. एवढ्या मोठ्या गर्दीतही भाविकांनी गडाचा परिसर, मंदिर परिसर आणि मंदिरात स्वच्छता राखल्याबद्दल देवस्थान समितीने समाधान व्यक्त केले. राज्यात शेगावनंतर मंदिराच्या स्वच्छतेच्या बाबतीत मोहटादेवी देवस्थानचा क्रमांक लागतो, असेही नमूद करण्यात आले.

अष्टमीच्या होमहवनाच्या पूर्णाहुतीप्रसंगी वैश्विक कल्याणासह सर्व प्राणिमात्रांच्या रक्षणासाठी प्रार्थना करण्यात आली. पौरोहित्य करणाऱ्या ब्रह्मवृंदांनी उच्चारलेल्या संकल्पाचा अर्थ समजल्यानंतर काही काळ वातावरण भावूक झाले. महाआरतीनंतर एकमेकांचा निरोप घेताना काही भाविकांचे कंठ दाटून आले. पुढील वर्षीही नवरात्रोत्सवासाठी गडावर येण्याचे भाग्य लाभावे, अशी प्रार्थना भाविकांनी आई जगदंबेच्या चरणी केली. उत्सवानिमित्त गडावर करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईचेही भाविकांनी कौतुक केले.

नवरात्रोत्सवानंतरच्या कार्यक्रमांत दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी शस्त्रपूजन होणार आहे. बुधवारी देवीची यात्रा, तर गुरुवारी कुस्त्यांचा हंगामा आणि कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी आरती व महाप्रसादाने संपूर्ण नवरात्रोत्सवाची सांगता होणार आहे.



शारदीय नवरात्रोत्सवाच्या कालावधीत विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांच्या वतीने भाविकांसाठी आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. ट्रस्टच्या नवीन अत्याधुनिक कार्डियाक रुग्णवाहिकेचे देवस्थानच्या वतीने पूजन करण्यात आले.

यावेळी मोहटादेवी देवस्थान समितीचे विश्वस्त तथा गटविकास अधिकारी राजेंद्र धस, विश्वस्त शशिकांत दहिफळे, शुभम दहिफळे, राजेंद्र शिंदे, अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. कल्याण बडे, ॲड. प्रसन्न दराडे, बाळूशेट लाहोटी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, देवस्थानचे कर्मचारी, ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते. श्रीरामपूर येथील उद्योगपती बाबासाहेब चिडे यांचीही उपस्थिती होती.

# संतविचारांच्या आचरणातूनच समाजात स्थैर्य आणि संस्कारांची जपणूक होईल : ह.भ.प. संपत महाराज भोर

**• अकोले । वीरभूमी–**

संतांनी आपल्या अभंगवाणीतून समाजाला दिलेली शिकवण केवळ आध्यात्मिक उपदेशापुरती मर्यादित नसून मानवी जीवनाला योग्य दिशा देणारी आहे. संतविचारांचे केवळ श्रवण न करता त्यांचे प्रत्यक्ष आचरण जीवनात उतरविले, तरच समाजात स्थैर्य, सद्भावना आणि संस्कारांची जपणूक होऊ शकेल, असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संपत महाराज भोर यांनी केले.

अकोले तालुक्यातील पिंपळदरी येथे येडूआई देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात सहाव्या माळेनिमित्त ह.भ.प. संपत महाराज भोर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी संत जनाबाई यांच्या गाथेतील 'डोईचा पदर आला खांद्यावरी' या अभंगाचे निरूपण करत भक्ती, अध्यात्म, सामाजिक परिवर्तन आणि आधुनिक जीवनमूल्यांची प्रभावी सांगड घातली.



संत जनाबाईंच्या अभंगातून व्यक्त होणारी भक्तीची उत्कटता, आत्मविश्वास, निर्भयता आणि सामाजिक बंधनांच्या पलीकडे जाणारी विचारसरणी यांचा उलगडा करत महाराजांनी संतसाहित्याचे आजच्या काळातील महत्त्व विशद केले. संतांनी शेकडो वर्षांपूर्वी मांडलेले विचार विज्ञाननिष्ठ आणि आधुनिक युगातही तितकेच मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले. समाजात भौतिक प्रगतीबरोबरच नैतिक मूल्यांची जोपासना होणे आवश्यक आहे. शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन समृद्ध होत असले, तरी माणुसकी, परस्पर आदर, सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये. आधुनिक विचारांचा स्वीकार करतानाच संतांनी दिलेल्या समता, विवेक आणि सदाचाराच्या शिकवणीचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कीर्तन ही केवळ धार्मिक परंपरा नसून समाजमन घडविणारी प्रभावी लोकशिक्षणाची चळवळ आहे. संतांनी अभंग आणि कीर्तनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना जीवनाचे तत्त्वज्ञान समजावून सांगितले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भेदभाव आणि अनिष्ट रूढींना विरोध करत त्यांनी माणुसकीचा संदेश दिला, असे महाराजांनी नमूद केले.

नवरात्रोत्सवातील अखंड हरिनाम सप्ताहामुळे पिंपळदरी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमास येडूआई देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रद्धा लोंढे सातासमुद्रापार पोहोचवणार 'रयत'चा विचार!

## मीनाताई जगधने यांचा विश्वास । राष्ट्रीय विजेत्या श्रद्धासह मार्गदर्शक सुभाष गायकवाड यांचा गौरव

**• श्रीगोंदा । वीरभूमी–**

चांडगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी श्रद्धा रमेश लोंढे हिने 'इन्स्पायर मानक' अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून देशात शाळेचा नावलौकिक वाढवला. तिच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मॉडेलची आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याने चांडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्रद्धा आणि तिचे मार्गदर्शक शिक्षक सुभाष गायकवाड यांचा मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्य मीनाताई जगधने व बाबासाहेब भोस यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला.

आपल्या यशाचे श्रेय सुभाष गायकवाड सरांच्या मार्गदर्शनाला, मेहनतीला आणि प्रोत्साहनाला



देताना श्रद्धा भावूक झाली. भविष्यात आपल्या पुरस्काराचा उल्लेख करताना स्वतःच्या नावापूर्वी सरांचे नाव घेतले जावे, अशी अपेक्षा तिने व्यक्त केली. विद्यार्थिनीने शिक्षकांप्रती व्यक्त केलेल्या या कृतज्ञतेने उपस्थितांची मने जिंकली.

महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची संधी मिळाली आहे. श्रद्धा आपल्या यशातून कर्मवीरांचा 'रयत' विचार सातासमुद्रापार पोहोचवेल, असा विश्वास मीनाताई जगधने यांनी व्यक्त केला. सुभाष गायकवाड यांनी दीपस्तंभाप्रमाणे कार्य करून अन्य शिक्षकांसमोर आदर्श निर्माण केला आहे, असेही त्या म्हणाल्या.

संस्थेचे कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस यांनी श्रद्धाचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय गुणवत्ता विकास कक्षातील काकासाहेब वाळुंजकर, तुकाराम कन्हेकर आणि नवनाथ बोडखे यांनीही श्रद्धा व गायकवाड यांचे कौतुक केले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, सुधीर साबळे, रवींद्र म्हस्के, स्कूल कमिटीचे सदस्य दत्तात्रय वाघ, विनायक रसाळ, रवींद्र म्हस्के, महादेव म्हस्के, महेंद्र म्हस्के, संतोष म्हस्के, ज्ञानेश्वर दरेकर, अभिमान सोनवणे, प्रा. कल्पना झगडे, गणेश वाळुंज, वृषाली दरेकर, वर्षा भोईटे, दत्तात्रय मोरे, राजेंद्र खेडकर, विक्रम घालमे, सचिन ससाणे आणि हौसराव दांगडे यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुधीर साबळे यांनी केले, तर आभार राजेंद्र म्हस्के यांनी मानले.

# अभिनव शिक्षण संकुलात गरबा महोत्सव उत्साहात

**• अकोले । वीरभूमी–**

अभिनव शिक्षण संस्थेच्या वतीने शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी वसुंधरा अकॅडमी स्कूल लॉन, अकोले येथे गरबा महोत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. संस्थेतील शिक्षिका, महिला कर्मचारी, महिला पालक तसेच अकोले तालुक्यातील महिलांनी या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक वेशभूषा, गरब्याचा ठेका आणि आकर्षक नृत्याविष्कारांमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून गेला.

कार्यक्रमाला अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले,



संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या कुसुम वाकचौरे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या स्मिता पुंड आणि ग्रंथालय विभागप्रमुख मनीषा आभाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गरबा महोत्सवात महिलांसाठी उत्कृष्ट सादरीकरण, उत्कृष्ट वेशभूषा आणि उत्कृष्ट द्वंद्व नृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी महिलांनी नृत्यकौशल्य, कलात्मकता आणि पारंपरिक वेशभूषेचे सुंदर दर्शन घडविले. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेतील विजेत्या : उत्कृष्ट सादरीकरण– प्रथम क्रमांक : प्राजक्ता वाकचौरे, द्वितीय क्रमांक : माधवी चव्हाण, तृतीय क्रमांक : कल्याणी कोकणे, उत्कृष्ट वेशभूषा– प्रथम क्रमांक : प्रगती थेटे, द्वितीय क्रमांक : नेहा वागळे, तृतीय क्रमांक : सायली रासने. उत्कृष्ट द्वंद्व नृत्य– प्रथम क्रमांक : पूजा भालेराव व सोनाली घुले.

या महोत्सवामुळे महिलांना आपली कला आणि नृत्यकौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. पारंपरिक सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याबरोबरच महिलांमधील स्नेहभाव, एकात्मता आणि परस्परसंवाद वाढविण्यासही या उपक्रमाची मदत झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वसुंधरा अकॅडमीचे संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ, मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या नृत्यशिक्षिका काव्या कदम आणि वसुंधरा अकॅडमीचे नृत्यशिक्षक प्रशांत दिवेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे परीक्षण अर्चना एखंडे यांनी केले.

समारोपप्रसंगी डॉ. जयश्री देशमुख यांनी उपस्थित मान्यवर, सहभागी महिला, परीक्षक आणि आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या सर्वांचे कौतुक केले. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, आकर्षक वेशभूषा आणि गरब्याच्या तालावर रंगलेला आनंदोत्सव हे या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

# पहाटेच्या दुर्गादौडीने कोतूळमध्ये उत्साह

**• अकोले । वीरभूमी –**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ओम साईराम प्रतिष्ठान व हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने आयोजित पहाटेच्या दुर्गादौडीमुळे कोतूळ परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दुर्गादौडीचे हे दुसरे वर्ष असून, देवीचा जयघोष, भगवे ध्वज आणि पारंपरिक वेशभूषेतील महिला व युवकांच्या सहभागामुळे परिसरात चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे.

पहाटेच्या सुमारास आयोजित या दुर्गादौडीत महिला, युवकांसह नागरिकही उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. हातात भगवे ध्वज घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात येणाऱ्या या दौडीमुळे परिसर भक्तिमय



होत आहे. देवीच्या जयघोषाने रस्ते दुमदुमत असून, नागरिकांकडूनही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

दुर्गादौड हा केवळ धार्मिक उपक्रम नसून युवकांमध्ये शिस्त, संघभावना, व्यायामाची आवड आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारा उपक्रम ठरत आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या युवकांमुळे सामाजिक एकोपा वाढण्यासही मदत होत आहे. ठिकठिकाणी भगव्या ध्वजांचे औक्षण करून आणि फुलांची उधळण करत दुर्गादौडीचे स्वागत केले जात आहे.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १० हजारांची मदत द्या!

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मागणी । कर्जवसुलीला स्थगिती आणि व्याजमाफीसाठी शासनाला निवेदन

**• पाथर्डी । वीरभूमी–**

तीव्र दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हेक्टरी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान तातडीने द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाथर्डी तालुका शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. दसऱ्यानंतर तातडीने मदत जाहीर करून शेतकऱ्यांची दिवाळी साजरी होण्यासाठी शासनाने पावले उचलावीत, अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाला दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील पावसाळा संपला असून काही भाग वगळता राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढली आहे. पावसाच्या आशेने शेतकऱ्यांनी पेरणी केली; मात्र सुरुवातीच्या काही पावसांनंतर संपूर्ण हंगाम कोरडा गेल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. या परिस्थितीत दिवाळीपूर्वी पीक नुकसानभरपाईसह हेक्टरी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी मनसेने केली आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मनसेने शासनाकडे पुढील मागण्या केल्या आहेत. यामध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १० हजार रुपये तातडीने सानुग्रह अनुदान द्यावे. पशुसंवर्धन विभागाकडे पशुधनाची नोंद करून चाऱ्यासाठी अनुदान उपलब्ध करून द्यावे. पुढील आठ महिने खासगी बँका, फायनान्स कंपन्या आणि शासकीय बँकांना शेतकरी कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याचे आदेश द्यावेत. या कालावधीत शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारणी करू नये. उपलब्ध पाणीस्रोतांचे योग्य नियोजन करून जनावरांसह नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

यावेळी मनसेचे दक्षिण जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी सांगितले की, शेतकरी सध्या अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेत. त्यामुळे मनसेने केलेल्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा शेतकऱ्यांचे जीवन आणि हित जपण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते आणि तहसीलदार उद्धव नाईक यांनी प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. मनसेने केलेल्या मागण्यांनुसार शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी, यासाठी शासनाकडे मागणी करून पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी मनसेचे दक्षिण जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शहराध्यक्ष संदीप काकडे, उपजिल्हाध्यक्ष देविदास हंडाळ, विद्यार्थी सेनेचे माजी जिल्हाध्यक्ष प्रवीण शिरसाट, शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष अंबादास शेळके, तालुका उपाध्यक्ष एकनाथ सानप यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

